**<u>नि.दि.दावा क्र. ११/२०१०</u>**

निशाणी क्र. ४७.

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र. २</u>**

सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की,

नाव– सुभाष ढोलु साबळे,

वय– ६० वर्षे, व्यवसाय– सेवानिवृत्त निमताणदार,

रा. नागझिरे, ता. साक्री, जि. धुळे.

<u>वादीतर्फे साक्षीदाराचा सरतपास विधिज्ञ श्री. बी. एस. झावरे यांचेमार्फत शपथेवर सुरु</u>–

१. मी उपअधिखक, भुमिअभिलेख कार्यालय, पारनेर येथे दि.१२.०६.२०२० रोजी हजर झालो तेव्हापासुन मी मे, २०२३ पर्यंत पारनेर येथे कार्यरत होतो. मला सदर प्रकरणामध्ये कोर्ट कमिशनर मोजणीदार म्हणुन नियुक्त केले होते. त्याप्रमाणे पुर्व सूचना देऊन सदरील गट क्रमांक ४४७ व ४४८ यांची वहितीप्रमाणे मोजणी केली. त्याप्रमाणे वादी यांचा जबाब घेण्यात आला. प्रतिवादी यांनी जबाब देण्यास नकार दिला. तसेच सदर दिवशीच पंचनामा करण्यात आला. दि.२४.०३.२०२२ रोजी मोजणी करण्यात आली व तसा पंचनामा व जबाब घेण्यात आले. मोजणीनंतर मी कार्यालयात मुळ अभिलेखाची पडताळणी केली. पडताळणी केल्यानंतर वस्तुस्थितीप्रमाणे अभिलेख बसविण्यात आलेले आहेत. त्यानंतर सदर क्षेत्राचे अतिक्रमण होते ते समजुतीच्या टिपांमध्ये वेगवेगळया रंगाने दाखविण्यात आले. शिरस्तेदार व छाननी लिपिक यांनी अभिलेख पडताळणी करुन सदरील प्रकरण न्यायालयात वर्ग केले. न्यायालयाने उपअधिक्षक यांना केलेल्या आदेशाप्रमाणे मोजणी करण्यात आली व पंचांची नियुक्ती केली. साक्षीदार यांना समक्ष नोटीसा दिल्या होत्या. प्रतिवादी यांनी जबाब देण्यास नकार दिल्याबाबत तसा जबाबाची प्रत आमच्याकडे आहे. सदर जबाबास **निशाणी क्र.४८** देण्यात येते. मोजणीनंतर पंचनामा करण्यात आला. त्यास माझी सही आहे व त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.४९** देण्यात येते. मोजणी नकाशाचे ब प्रत न्यायालयात दाखल केली आहे व अ प्रत आमच्या कार्यालयात जमा आहे. मोजणी नकाशाची अ प्रत आणि ब प्रत ही सारखीच असते. मोजणी नकाशा ब प्रतीस **निशाणी क्र.५०** देण्यात येते. आता मला मोजणी नकाशाची अ प्रत दाख्विण्यात आली. त्यामध्ये गट क्र.४४७ व ४४८ याची मोजणी करुन वादी यांचा गट क्र.४४७ असून गट क्र.४४८ चे कब्जेदार यांनी ०.०४ गुंठे अतिक्रमण केल्याचे दिसून आले. तसे मोजणी नकाशात पोपटी रंगाने दर्शविण्यात आलेले आहे. त्यावर छाननी लिपिक,

शिरस्तेदार यांच्या सहया आहेत. मोजणीबाबतचे सर्व कागदपत्र सही शिक्क्यासह दि.३१.०५.२०२२ रोजी जा.क्र.२५४७/२०२२ अन्वये न्यायालयात दाखल केले. सदरील प्रकरणात पानांक १ ते ६१ आहेत.

सरतपास पुर्ण.

**प्रतिवादींतर्फे उलटतपास विधिज्ञ श्री. एस. आर. बिहाणी यांचेमार्फत–**

मी सन १९९० पासुन मोजणीदार आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी मोजणीदार म्हणुन कुठल्याही विद्यापिठाची पदवी घेतलेली नाही. पुर्वीची केलेली मोजणी टिपण ही साखळी पध्दतीची झाली. मी मशिनच्या सहाय्याने मोजणी केली. कुठल्याही जमीनीला चढउतार असतो व त्या चढ उताराप्रमाणे मोजणी होती. मशिनने एअर डीस्टन्सने मोजणी केली जाते. हे म्हणणे खरे नाही की, मशिनमध्ये चढ उतार दिसत नाही. हे म्हणणे खरे आहे की, जमीन कोठे खाली तर कोठे वर अशी असते. हे म्हणणे खरे आहे की, मशिनने जमीनीला खेटुन मोजले जात नाही. हे म्हणणे खरे नाही की, चढउताराची वस्तुस्थिती मशिनमध्ये येत नाही. पुर्वीची मोजणी ही एकर गुंठयात झालेली होती. हे म्हणणे खरे आहे की, आताची मोजणी हेक्टर आर मध्ये होते. हे म्हणणे खरे नाही की, आर व गुंठयामध्ये फरक नाही. एक आर व एक गुंडा यामध्ये फरक आहे. गुंठा हा लहान व आर हा मोठा आहे.

मोजणी पाहताना पुर्वीच्या झालेल्या मोजणीचा नकाशा पाहिला जातो. यामध्ये पुर्वी मोजणी कोणी केली होती हे मी सांगु शकत नाही. दहा वर्षापुर्वी एखादी मोजणी झाली असेल तर ती रदद होते तसेच दहा वर्षाच्या आतील असेल तर ती अस्तीत्वात असते परंतु सदर प्रकरणामध्ये तसा कोणताही मोजणी अहवाल नव्हता. सदर प्रकरणामध्ये यापुर्वी झालेल्या मोजणीची मला माहिती नाही. आम्ही सहधारकांना रजिस्टर पोस्टाने नोटीस काढली नाही. समक्ष नोटीस देण्याची तरतुद आमच्या खात्यामध्ये नाही. प्रत्येक प्रकरणामध्ये समक्ष नोटीस देण्याची पध्दत माझी नाही. गट क्र.४४७ व ४४८ या सलग जमीनी आहेत. दोन्हीही जमीनीमध्ये बांध आहे. सदर बांधाची उंची व रुंदी आम्ही मोजली नाही.

विधिज्ञांनी सदर जमीनींची लांबी विचारली असता साक्षीदाराने पाहुन सांगण्यासाठी मुदत मागितली. म्हणुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब करण्यात आला.

श्रवणोत्तर स्वीकृत,

sd/–

दिनांकः– १८.११.२०२५ ( एम. सी. शेख )
पारनेर दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पारनेर.

<u>प्रतिवादीतर्फे साक्षीदाराचा उलटतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री. पी जे नांदे यांचेमार्फत शपथेवर पुढे सुरु</u>–

गट क्र.७०४ चा जुना सर्वे क्र.२५५/५ असा आहे व गट क्र.७४४ चा जुना सर्वे

क्र.२८०/२ असा आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत व इतर मिळकती फेरफार क्र.३९३२ नुसार आमचे आजोबा बबन हे मयत झाल्यानंतर माझे वडिल, दोन चुलते व एक आत्या यांच्या नावे आल्या. गट क्र.७०४ व ७४४ या मिळकती माझ्या वडिलांना वाटपात देण्यात आल्या याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. गट क्र.७०४ व ७४४ या मिळकती माझ्या वडिलांच्या नावे दिल्याबाबत माझ्या तोंडी कथनांव्यतिरिक्त कोणताही कागदोपत्री पुरावा नाही.

सखुबाई सखाराम शिंदे ही माझी आत्या आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र.७०४ व ७४४ या मिळकती माझी आजी दगडाबाई व आत्या सखुबाई यांच्या नावे देण्यासाठी वेगळया ठेवल्या होत्या. आम्ही सखुबाई हिचे हक्कसोड पत्र करुन घेतले नाही. तसेच सखुबाई हिला एकत्रीत मिळकतीतील काहीही क्षेत्र दिले नाही. हंगा येथे गटयोजना कधी लागु झाली हे मला सांगता येणार नाही.

मी दावा क्र.३/२००९ चा बिच्छुनाथची पत्नी हिचेविरुध्द केला होता. त्या दाव्यामध्ये आमच्या बाजुने निकाल झाला. निकाल आमच्या बाजुने झाला याबाबत कागदोपत्री पुरावा दाखल करण्यास मी तयार आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर दाव्याचे निकालाविरुध्द मी अपिल क्र.१०१/२०१८ चे जिल्हा न्यायालयात दाखल केले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्या अपिलाचा निकाल देखील आमच्याविरुध्द गेला.

माझ्या बहिणीचे नाव बायडाबाई शिंदे असे आहे. माझ्या बहिणीने कलम ८५ प्रमाणे पारनेर तहसिल कार्यालयात वाटणीबाबत लिहून वादीला दावा मिळकतीतील त्याचा हिस्सा दिला होता व फेर क्र.३६६९ नुसार त्याची नोंद झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, वादीचा हिस्सा दावा मिळकतीत होता म्हणुन बायडाबाईने त्याचा हिस्सा दिला. हे म्हणणे खरे नाही की, कुठल्याही प्रक्रियेचा अवलंब न करता सदरचा फेर तलाठी यांना हाताशी धरुन तो रद्द करुन सदर मिळकत पुन्हा बायडाबाईच्या नावे करुन घेतली. बायडाबाईने तीन लाख रुपये दिल्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा नाही.

हे म्हणणे खरे आहे की, आमच्या घरामध्ये सर्वात मोठे माझे वडिल शिवराम होते. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडिल घरातील कर्ता पुरुष असल्यामुळे दावा मिळकती या माझ्या वडिलाच्या नावे होत्या. माझे वडिल सन २००३ मध्ये मयत झाले. हे म्हणणे खरे आहे की माझे वडिल मयत झाल्यानंतर सदर मिळकत मी, माझी आई व माझ्या बहिणीच्या नावे आली. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत सोडुन इतर मिळकतींचा बहुतांशी हिस्सा मी, माझी

आई व माझी बहिण बायडाबाई यांनी विक्री केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर मिळकत माझी आत्या, चुलते यांच्या नावे येऊ नये म्हणुन मी दावा मिळकत ही माझ्या वडिलांच्या नावे होती असे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींना दावा मिळकतीमध्ये हिस्सा मिळु नये म्हणुन मी खोटा जबाब देत आहे.

उलटतपास पुर्ण. फेरतपास कामी नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/–

दिनांक : १७/११/२०२५

( एम. सी. शेख )

पारनेर

दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, पारनेर